## संक्षिप्त वृत्त



अक्कलकोट येथील व्यापारी नागेश कोनापुरे यांची नात श्रीशा अंबेसंगे हिचे गुढी पाडवा निमित्त पालकांनी छोटी गुढी सोबत काढलेले छायाचित्र. सोशल मिडीयावर नेटकऱ्यांनी यास मोठी पसंती दिली आहे.



अधिकाऱ्यांना क्षेत्रीय अधिकारी राजेश खांडेकर, व्ही.एस.हिबारे, ए.आर.मुलाणी, आनंद शिंदे, श्रीशैल हिरेमठ यांनी प्रशिक्षण दिले.

### अक्कलकोट येथे मतदान अधिकाऱ्यांना तीन दिवस प्रशिक्षण

**अक्कलकोट** : लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अक्कलकोट येथे मतदान अधिकारी व सहायक मतदान अधिकाऱ्यांना प्रात्यक्षिक व मौखिक प्रशिक्षणाला प्रारंभ तहसीलदार विनायक मगर यांच्या हस्ते करण्यात आला. प्रशिक्षण सलग तीन शनिवार दि. ६ ते सोमवार दि. ८ असे तीन दिवस चालले.क्षेत्रीय अधिकारी, सहायक क्षेत्रीय अधिकारी, यांनी मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी वर्ग १, मतदान अधिकारी वर्ग २ अशा एक हजार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण अधिकारी राजेश खांडेकर, क्षेत्रीय अधिकारी.व्ही एस हिबारे सहाय्यक क्षेत्रीय अधिकारी ए.आर. मुलाणी, सहायक क्षेत्र अधिकारी आनंद शिंदे, श्रीशैल हिरेमठ आदींनी दिले.

### किरकोळ वादामुळे विवाहिता मुलीसह बेपत्ता

**सोलापूर** : बाळे येथील ३१ वर्षीय विवाहिता आपल्या लहान मुलींसह शुक्रवार (दि.५) राहत्या घरातून किरकोळ वाद करून बेपत्ता झाली आहे. याप्रकरणी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात बेपत्ता झाल्याची नोंद केली आहे. सुषमा संतोष माने (वय-३१, रा. प्लॅट नं १०५,दहावा मजला, वैष्णवी हाईट) ह्या कुटुंबियासह वास्तव्याला आहेत. ५ एप्रिल रोजी दुपारी त्या घरात कुणालाही काहीही न सांगता दोन वर्षाच्या मुलीला घेवून बेपत्ता झाल्या आहेत. पती संतोष माने यांनी फौजदार चावडी पोलिस ठाण्यात हरविल्याची तक्रार दिली आहे. विवाहिता आणि बालिका कुणालाही आढळून आल्यास फौजदार चावडी पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे. तपास हेडकॉन्स्टेबल आर.एल.बाचावार हे करीत आहे. सुषमा माने, वय-३१,कपडे मोरपंखी काळ्या रंगाची लेगीज व ओवी माने, वय-२, कपडे पांढऱ्या करडा रंगाचा फ्रॉक, बदामी रंगाची क्वीन हॅट असे परिधान केले आहे.

# नातेपुते येथे स्वागत यात्रेतून हिंदू नववर्षाचे स्वागत

## महिलांची मोटरसायकल रॅली, कलशासह १५० जणींचा सहभाग

**नातेपुते/प्रतिनिधी**






जगद्‌गुरू रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्य महाराज व कानिफनाथ महाराज यांच्या प्रेरणेने नातेपुते (ता.माळशिरस) येथे गुढीपाडवा व हिंदू नववर्ष स्वागत करण्यासाठी भव्य मिरवणुक काढण्यात आली.

डॉ. किसन मोहिते व मनीषा मोहिते यांनी माऊलींच्या प्रतिमेचे पूजन करून मिरवणुकीस सुरुवात केली. मिरवणुकीमध्ये स्वागत यात्रा मुख्य बॅनर, ८० महिलांची मोटार सायकल रॅली, कलश घेऊन १५० महिलांचा सहभाग होता. राम, लक्ष्मण, सीता, हनुमान आदी देवतांच्या जिवंत देखाव्यांचा सहभाग होता. लहान मुले-मुली यांचे भजनी मंडळ, गुरुमाऊलींचा रथ, लेझीम पथकही सहभागी होते.

रॅलीची सुरुवात नातेपुते येथील राज वैभव सांस्कृतिक भवनातून झाली. मिरवणुकीची सांगता आरतीने झाली. निरीक्षक दादासाहेब मते, जिल्हाध्यक्ष आबासाहेब शिंदे यांनी मार्गदर्शन केले. जिल्हा महिलाध्यक्ष सविता परांडे यांनी आभार मानले. आभारप्रदर्शन सचिन बुरंगे यांनी केले. भक्तांना महाप्रसादाची सोय केली होती.

जिल्हा निरीक्षक दादासाहेब मते, जिल्हाध्यक्ष आबासाहेब शिंदे, जिल्हा महिलाध्यक्षा सविता परांडे, जिल्हा युवा प्रमुख देविदास ननवरे, माळशिरस तालुकाध्यक्ष पोपट जगदाळे, महिला तालुकाध्यक्ष मनिषा मोहिते यांनी या मिरवणुकीचे आयोजन केले होते.

**नागरिकांकडून पुष्पवृष्टी**

नातेपुते शहरातील नागरिकांकडून स्वागत मिरवणुकीवर पुष्पवृष्टी करण्यात आली. मिरवणुकीमध्ये जिल्ह्यातून १५०० भक्तगण सहभागी झाले होते.



श्रीशैलम येथे संतांना अन्नदान करताना बसलिंगप्पा खेडगी, शोभा खेडगी, महादेवी धोडमनी, पवित्रा खेडगी आदी

# खेडगी परिवाराकडून साधू संतांना अन्न, वस्त्र, वाटप

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

माजी नगराध्यक्ष तथा अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी परिवाराच्यावतीने तेलंगणा राज्यातील श्रीशैलम येथे मल्लिकार्जुन यात्रेनिमित्त देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या हजारो साधू-संतांना अन्नदान आणि चादरी, वस्त्र वाटप करण्यात आले.

दानशूर, शिक्षणमहर्षी चनबसप्पा खेडगी यांनी सुरु केलेली ही परंपरा त्यांचे पुत्र शिवशरण खेडगी यांनी सुरू ठेवली होती.

त्यांचाच वसा माजी नगराध्यक्षा शोभा खेडगी यांच्या मार्गदर्शनाखाली माजी नगराध्यक्ष बसलिंगप्पा खेडगी हे पुढे नेत आहेत. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर साधू संतांना अन्नदान व साहित्यांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी बसलिंगप्पा खेडगी, शोभा खेडगी, महादेवी धोडमनी, पवित्रा खेडगी, सिध्दम्मा कलशेट्टी, विजयालक्ष्मी यळमी, इंजिनिअर किरण पाटील, चन्नवीर खेडगी, स्तुती खेडगी, बसवराज गोरे, रावसाहेब तेगेहळळी, गुरुनाथ कलशेट्टी, परमेश्वर कलशेट्टी, मुत्तण्णा वाले, बसवराज स्वामी, सुरेश पेडसंगी, परमेश्वर कलबुर्गी, विजयकुमार माळाबागी, हणमंत कोळीआदींनी परिश्रम घेतले.

# अक्कलकोट तालुक्यात आठ दिवसांत १५ चोऱ्या

**अक्कलकोट/प्रतिनिधी**

अक्कलकोट शहर व तालुक्यात आठ दिवसात पंधरा ठिकाणी चोरी, घरफोडीच्या घटना घडल्या आहेत.

भुरीकवठे येथील दयानंद शिंदे यांची कडी कोंडा उचकटून चोरटे आत शिरले. मात्र महिला जाग्या असल्याने पसार झाले. बोरगाव येथील महंमदअली मकानदार, भीमा जिरगे यांचे घर फोडून मकानदार यांची २५ हजार रक्कम, तीन ग्रॅम सोन्याचे कर्णफुले, जिरगे यांचे ३५ हजार रुपये, एक तोळा सोनं चोरीला गेले आहे. नागणसुर येथील गंगाराम धानशेट्टी यांचे घर फोडून रिकामे हाताने जावे लागले आहे. बसवराज किणगी यांचे घर फोडले असता, त्यातील कपाटामधील १५ ग्रॅम सोने, २६ हजार रुपये लंपास केले. सिद्धाराम कवडी यांची मोटारसायकल चोरून नेली आहे. जगन्नाथ धानशेट्टी यांचे घर फोडून कपाटातील १५ हजार रुपये रक्कम चोरले. धनशेट्टी हे दवाखानासाठी मुलांकडे विजापूरला गेले होते.

अक्कलकोट शहरात दोन दिवसांपूर्वी रात्री वीज गायब झाल्याचे पाहून पुकाळे प्लॉटमध्ये चोरट्याने धुमाकूळ घातला. मात्र नागरीक जागे असल्याने पुढील अनर्थ टळला. त्याच दिवशी बॅगेहळळी रोडवरील समर्थनगर भागात मंगेश घाडगे, बसवराज कलाल, नागनाथ पाटील यांचे घरे फोडले, मात्र हाती काहीच लागले नाही. भिमणा पुजारी यांच्या घरी केवळ पत्नी होती. तेव्हा चोरटे कडीकोंड उचकटून चोरींचे प्रयत्न करीत असताना आतील बाजूस असलेल्या महिलांनी आरडाओरडा केल्याने पळून गेले.

मल्लिनाथ पाटील, अब्बास सुतार यांचे घर फोडून किरकोळ साहित्य चोरले. नागनाथ भोळे यांचे गोडावून फोडून नासधूस करून गेले आहेत.

# अक्कलकोट प्रगती पथावर नेण्याची जबाबदारी नागरिकांची

## शांतता बैठकीत प्रीतमकुमार यावलकर यांचे प्रतिपादन

**अक्कलकोट/प्रतिनिधी**




शांतता ही आर्थिक प्रगतीची नांदी असते. स्वामीसमर्थांची अक्कलकोट नगरी प्रगती पथावर नेण्याची जबाबदारी नागरिकांची आहे.असे प्रतिपादन अप्पर पोलीस अधीक्षक प्रीतमकुमार यावलकर यांनी केले.

रमजान ईद, रामनवमी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त उत्तर पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक आयोजित केली होती.यावेळी ते बोलत होते. या वेळी पोलिस उपाधीक्षक विलास यामावार, तहसीलदार विनायक मगर, अप्पर तहसीलदार श्रीकांत कांबळे, मुख्याधिकारी सचिन पाटील, पोलीस निरीक्षक महेश स्वामी आदी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.

प्रारंभी उत्तर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे यांनी स्वागत केले. राष्ट्रवादी तालुकाध्यक्ष दिलीप सिध्दे, आरपीआयचे अध्यक्ष अविनाश मडिखांबे, प्रहार संघटना अध्यक्ष अमर शिरसाट, जिल्हा काँग्रेस कमिटीचे कार्याध्यक्ष अशपाक बळोरगी, भाजपा शहर अध्यक्ष शिवशरण जोजन, सकल मराठा समाज समन्वयक बाबासाहेब निंबाळकर,मुस्लिम समाज मौलाना दावण्णा यांनी मनोगत व्यक्त केले.

प्रीतमकुमार यावलकर म्हणाले सर्व समाज घटकांनी धार्मिक सलोखा बंधुभाव निर्माण करणे कर्तव्य आहे. काही घडले तर ताबडतोब पोलिस यंत्रणेशी संपर्क साधावा असे आवाहन केले.

या बैठकीला भाजपा अल्पसंख्याक जिल्हाध्यक्ष कोरबू, जिल्हा काँग्रेस उपाध्यक्ष अरुण जाधव, वंचीत बहुजन आघाडीचे अध्यक्ष चंद्रशेखर मडिखांबे,शहर शिवसेना प्रमुख योगेश पवार, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष शिवराज स्वामी, कॉंग्रेस शहर अध्यक्ष रईस टिनवाला , नगरसेवक सद्दाम शेरीकर सुनील खवळे, मैनुद्दीन कोरबू, सहायक पोलिस निरीक्षक चव्हाण, पोलीस गोपनीय शाखेचे गजानन शिंदे, शरद चव्हाण आदी उपस्थित होते.

### जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीरात आज प्रकटदिनानिमित्त कार्यक्रम

**सोलापूर/प्रतिनिधी**

शहरातील मुरारजी पेठेतील जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ मंदीरात बुधवारी (दि.१०) श्री स्वामी समर्थ महाराज प्रकटदिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम होणार आहेत. श्री स्वामी समर्थ महाराज प्रकटदिनानिमित्त बुधवारी सकाळी श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मुर्तीस अभिषेक होऊन दुपारी १२ वाजता गुलालाचा कार्यक्रम होणार आहे. सायंकाळी भजन व स्वामी गीतांचा कार्यक्रम होणार असून सायंकाळी ७ वाजता महाआरती होऊन महाप्रसाद वाटप होणार आहे. कार्यक्रमास स्वामी भक्तांनी तसेच परिसरातील नागरीकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मंदीराचे संस्थापक अध्यक्ष गोरखनाथ डोंगरे, श्री स्वामी समर्थ समाजसेवी न्यासचे अध्यक्ष प्रमोद डोंगरे व संचालक मंडळाने केले आहे.

# स्वामी पुण्यतिथीसाठी धान्य स्विकृतीस प्रारंभ

## पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे व महेश इंगळे यांच्या हस्ते सुरुवात

**अक्कलकोट/प्रतिनिधी**




श्री स्वामी समर्थांचा १४६ वा पुण्यतिथी महोत्सव ६ मे रोजी आहे. महोत्सवकरिता यंदाही महाप्रसाद बनविण्याकरिता श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात धान्य स्वीकारण्यात येत आहे.

मंगळवारी (दि.९) या उपक्रमाचा प्रारंभ अक्कलकोट उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे व मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या हस्ते करण्यात आला. स्वामींचा भोजन महाप्रसाद बनविण्याकरिता भाविकांनी महेश इंगळे यांच्याकडे धान्य सुपूर्द केले.

श्री स्वामी समर्थांचा पुण्यतिथी उत्सव हा गेल्या १४५ वर्षांपासून येथे होत आहे. धर्मसंकीर्तन, नामविणा सप्ताह, भजन सेवा, पारायण सेवा, नित्यअनुष्ठान इत्यादी धार्मिक कार्यक्रमांबरोबर हजारो स्वामी भक्तांना महाप्रसाद देण्याचीही परंपरा आहे. या निमित्त यंदाही स्वामी भक्तांकडून धान्य स्वीकारण्यात येत आहे.

याप्रसंगी मंदिर समितीचे सचिव आत्माराम घाटगे, विश्वस्त महेश गोगी, शिवशरण अचलेर, गिरीश पवार, प्रसाद पाटील, दीपक जरीपटके, सागर गोंडाळ, अविनाश क्षीरसागर, प्रसाद सोनार, मोहन शिंदे, विपुल जाधव, श्रीकांत मलवे, उज्वला सरदेशमुख, ज्योती जरीपटके, महेश काटकर, जयप्रकाश तोळणूरे, सचिन पेठकर, सचिन हन्नुरे आदींसह भक्त उपस्थित होते.

### श्री स्वयंभू जागृत पंचमुखी मारुती यात्रेला प्रारंभ

**२३ एप्रिलपर्यंत विविध कार्यक्रमांचे आयोजन**



**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील म्हैसलगे येथील ग्रामदैवत श्री स्वयंभू जागृत पंचमुखी मारुती देवस्थानच्या वतीने यात्रा महोत्सवाचे आयोजन केले आहे. महोत्सवात पंच कमिटीच्यावतीने २३ एप्रिलपर्यंत विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केल्याचे उपाध्यक्ष श्रीशैल भतगुणकी यांनी सांगितले. गुढीपाडव्यादिवशी पंचांग पठण व पालखी महोत्सवाला प्रारंभ झाला. पालखी महोत्सव १८ तारखेपर्यंत चालणार आहे. यानंतर दि.१६ एप्रिल रोजी पवमान होम, दि.१७ रोजी राम जन्मोत्सव दुपारी १२ वाजता, दि.१८ रोजी धनगरी ओव्याचा कार्यक्रम होईल. याच दिवशी रक्तदान शिबिर,सर्व रोग निदान शिबिर, दंत तपासणी शिबिर होईल.

आरोग्य शिबिरात तज्ञ डॉक्टर सहभागी होणार आहेत.दि.१९ रोजी सायंकाळी ५ वाजता दही हंडी, महाप्रसाद कार्यक्रम, दि.२० रोजी कन्नड कार्यक्रम, सायंकाळी ५ वाजता जंगी कुस्त्या पार पडतील. रात्री १० वाजता ग्रामपंचायती गंगव्वा अर्थात अप्पा हिंग मगा हांग हे कन्नड नाटक सादर होणार आहे. उद्घाटन निवृत्त मुख्याध्यापक दशरथ भतगुणकी व युवा नेते रमेश देसाई यांच्या हस्ते पार पडेल. दि.२३ रोजी सकाळी ६ वाजता हनुमान जन्मोत्सव, गुलाल कार्यक्रमाने यात्रेची सांगता आहे. या दिवशी मुख्य हनुमान जन्मोत्सव कार्यक्रम असल्याने म्हैसलगे व परिसरातील भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन केले आहे, असे यात्रा पंच कमिटीच्यावतीने सांगितले. गुरुसिद्धप्पा जोकारे, सिद्धाराम पुजारी, भीमाशंकर बिराजदार, राहुल कुलकर्णी, उमाकांत कुलकर्णी, गौडप्पा पाटील, बाबूगौडा पाटील, इरणा सुतार प्रयत्नशील आहेत.

# आधारविना शिक्षकांच्या शाळा सुरु कशा?

## अतिरिक्त शिक्षकांचे प्रमाण वाढण्याची शक्यता

**जिल्ह्यातील २० हजार विद्यार्थी आधार लिंकिंगविना आधारहीन**



**सोलापूर/बळीराम सर्वगोड**

आधार लिंकचे जिल्ह्यात ८७ टक्के काम पूर्ण झाले आहे. जिल्ह्यात एकूण ८ लाख ३० हजार १४१ विद्यार्थी संख्या आहे. त्यापैकी ८ लाख ३ हजार ७२० विद्यार्थ्यांचे आधार लिंकिंग झाले आहे. अद्याप २१ हजार ४३१ विद्यार्थ्यांचे आधार उपलब्ध न झाल्याने लिंकिंग होऊ शकले नाही. याला जबाबदार कोण असा प्रश्न संबंधित विद्यार्थ्यांमधून होत आहे. राज्यातील इतर जिल्ह्यांपेक्षा सोलापूरचे कामकाज संथ गतीने होत आहे. परिणामी विद्यार्थ्यांच्या आकडेवारी पूर्ण पणे पोर्टल वर अपलोड होण्यास विलंब होत आहे. शिष्यवृत्ती योजना ,शालेय पोषण आहार अनुदानासह विविध शासकीय योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे आधार लिंकिंग बंधनकारक आहे. विद्यार्थ्यांच्या आधारविना त्यांचा इतर स्पर्धे मार्फत मिळणारे अनुदान मिळविण्यासाठी अडचणी निर्माण होत आहे.

विद्यार्थ्यांच्या आधार कार्ड अपडेट झाले नाही तर प्रणालीवर नोंदणी होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या इयत्ता व पटसंख्या कळत नाही. दहावी, बारावी तसेच शिष्यवृत्ती परीक्षावेळीसुद्धा अडचण निर्माण होईल. त्यामुळे पटसंख्या कमी दिसते. याचा परिणाम शाळेच्या अनुदानावर तसेच सेवक संचावर होतो. आधार अपडेट लवकर करून पदोन्नती देण्यात यावी. नवनियुक्त शिक्षकांना शाळा उपलब्ध करून द्यावी.

**-प्रशांत शिरगुर, स्पर्धा परीक्षा समन्वय समिती शिक्षक भरती संघटना.**

### संचमान्यतेमुळे निवड झालेल्या शिक्षकांना मिळेना नियुक्ती

तसेच संचमान्यतासाठीही अत्यावश्यक आहे. सरकारने अनेकदा आधार लिंकिंगसाठी मुदत दिली, मात्र त्यानंतरही जिल्ह्यातील २० हजार ४२१ विद्यार्थ्यांचे आधार लिंकिंग झाले नाही. बऱ्याच विद्यार्थ्यांचे जन्म दाखलेही उपलब्ध होत नसल्याने अडचणी येत आहेत. तसेच त्याबाबत शिबिर घेऊन माहिती देण्यासही सांगितले आहे. त्यामुळे २०२३ मध्ये निवड झालेल्या २६५ शिक्षकांचीसुद्धा पदोन्नीती व अतिरिक्तमुळे अडचण उद्भवत आहे. त्याचा फटका नवीन शिक्षकांना बसू शकेल.

### नवीन शैक्षणिक वर्षाच्या तोंडावर आधार अपडेट नाही

आधार कार्ड अपडेट करण्यासाठी गेल्या काहीवेळा मुदतवाढ दिली. टायपिंगच्या चुकीमुळे विद्यार्थ्यांच्या जन्मतारीख, नावात बदल आणि विद्यार्थ्यांच्या स्थलांतरामुळे अडचणी निर्माण होत आहेत. त्या सर्व गोष्टींची गांभीर्याने दखल घेऊन येत्या काही दिवसात सर्व आधार कार्ड अपडेट केले गेले पाहिजे. नाहीतर नवीन शैक्षणिक वर्षात अनेक शिक्षक अतिरिक्त होण्याची दाट शक्यता आहे. त्यामुळे शाळेच्या अनुदानावरही परिणाम होऊ शकतो.

### आरटीई प्रवेश प्रक्रिया रखडणार

जिल्ह्यात प्राथमिक, माध्यमिक व खाजगी माध्यमिक व प्राथमिक (शहरी, ग्रामीण आणि नागरी) अशा जवळपास २ हजार ६४९ शाळा आहेत. दिड वर्षापासून आरटीईची ५०३ प्रकरणे प्रलंबित होती. त्यात नूतनीकरणासह अनेक बाबींचा समावेश होता. तसेच आता नवीन धोरणामुळे इंग्रजी माध्यमाच्या शाळा व खासगी नामांकित शाळेत प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थ्यांची सुद्धा मोठ्या प्रमाणात हेळसांड होणार आहे.